# प्रकरण -:  ३ कंपनी हिशेबतपासणीस

भारतीय कंपनी कायदा ,२०१३ नुसार सार्वजनिक कंपनीने हिशेबतपासणीसाची नेमणूक करणे आवश्यक आहे. भागधारक कंपनीचे मालक असले तरी ते कंपनीच्या दैनंदिन कारभारात हस्तक्षेप करीत नाहीत. हिशेबतपासणीस हा भागधारकांचा प्रतिनिधी म्हणून कार्ये करीत असतो. कंपनीने ठरविलेल्या हिशेबाची व कंपनीच्या आर्थिक परिस्थितीची माहिती हिशेबतपासणीस आपल्या अहवालाद्वारे भागधारकांना देत असतो .

## कंपनीच्या हिशेबतपासणीसाची पात्रता

१) **व्यक्ती** - १९४९ नुसार चार्टर्ड अकाउंटंट कायद्यानुसार त्या व्यक्तीने चार्टड अकाउंटन्ट अंतिम परीक्षा पास केलेली असावी व ती व्यक्ती या संस्थेचा सभासद असावी .

२) **भागीदारी संस्था** - वरीलप्रमाणे नेमणूक करण्यास योग्य असलेल्या व भारतात हिशेबतपासणीसाचा व्यवसाय करणाऱ्या भागीदारी संस्थेची देखील कंपनीचे हिशेबतपासणीस म्हणून नेमणूक करता येते .

३) **१९५६ च्या मर्यादित हिशेबतपासणीसाच्या प्रशस्तिपत्रक कायद्यानुसार** - ज्या व्यक्तींना प्रशस्तिपत्रक दिलेले असेल त्या व्यक्ती कंपनीचा हिशेबतपासणीस म्हणून ओळखले जातात.

## कंपनी हिशेबतपासणीसाची अपात्रता –

२०१३ नुसार कंपनी कायद्याच्या कलम १४१ नुसार कंपनीचा हिशेबतपासणीस म्हणून कार्ये करण्यास खालील व्यक्ती अपात्र ठरतात –

1) संबंधित कंपनीचा अधिकारी किंवा नोकर
2) कंपनीच्या अधिकाऱ्याचा नोकर किंवा त्याचा भागीदार
3) जी व्यक्ती संबंधित कंपनीचा व्यवस्थापकीय प्रतिनिधी ,सचिव व खजिनदार या नात्याने कार्ये करणाऱ्या एखाद्या भागीदारी संस्थेचा भागीदार असेल.
4) जी व्यक्ती संबंधित कंपनीचा संचालक आहे व ५% पेक्षा जास्त भांडवल खरेदी केलेले आहे.
5) कंपनी

## कंपनीच्या हिशेबतपासणीसाची नेमणूक -

१) पहिल्या किंवा प्रथम हिशेबतपासणीसाची नेमणूक

२) सर्वसामान्य हिशेबतपासणीसाची नेमणूक

३) जर वार्षिक सर्वसाधारण सभेत हिशेबतपासणीसाची नेमणूक होऊ शकली नाही तर अशा परिस्थितीत हिशेबतपासणीसाची नेमणूक

४) हिशेबतपासणीसाची अकस्मिकरीत्या नेमणूक

५) हिशेबतपासणीसाने राजीनामा दिल्यास रिकाम्या पदावर नेमणूक

६) विशेष ठरावाद्वारे हिशेबतपासणीसाची नेमणूक

७) सरकारी कंपन्यांच्या हिशेबतपासणीसाची नेमणूक

८) विशेष हिशेबतपासणीसाची नेमणूक

९) संयुक्त हिशेबतपासणीस

## हिशेबतपासणीसाचे अधिकार

१) हिशेबपुस्तके , पावत्या व खातीपुस्तके तपासण्याचा अधिकार

२) माहिती व स्पष्टीकरण मिळविण्याचा अधिकार

३) विवरणे मिळविण्याचा अधिकार

४) सर्वसाधारण सभेची सूचना मिळविण्याचा अधिकार

५) सर्वसाधारण सभेस उपस्थित राहण्याचा अधिकार

६) कंपनीच्या शाखा तपासण्याचा अधिकार

७) मोबदला मिळण्याचा अधिकार

८) सभासदांना अहवाल सादर करण्याचा अधिकार

९) कंपनीची वार्षिक खाती तयार करून घेण्याचा अधिकार

१०) तज्ञ व्यक्तींचा सल्ला घेण्याचा अधिकार

११) कंपनीचे घटनापत्रक , नियामक व उद्देशपत्रक तपासण्याचा अधिकार

१२) नुकसानभरपाई वसूल करण्याचा अधिकार

१३) अहवालावर सही करण्याचा अधिकार

## कंपनीच्या हिशेबतपासणीसाचा मोबदला -

१) जर वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये हिशेबतपासणीसाची नेमणूक झालेली असेल , तर वार्षिक सभेमध्ये हिशेबतपासणीसाचा मोबदला ठरविण्यात येतो .

२) ज्या वेळी केंद्र सरकारकडून हिशेबतपासणीसाची नेमणूक केली जाते ; त्यावेळी केंद्र सरकार त्याचा मोबदला ठरविते .

३) ज्या वेळी हिशेबतपासणीसाची नेमणूक संचालक मंडळाकडून होते तेव्हा संचालक मंडळच हिशेबतपासणीसाचा मोबदला ठरविते .

४) कंपनी हिशेबतपासणीसाचा खर्च म्हणून काही रक्कम हिशेबतपासणीसाला देते तेव्हा ती रक्कम हिशेबतपासणीसाच्या मोबदल्यामध्ये समाविष्ट असते

५)ज्या वेळी हिशेबतपासणीच्या कामाव्यतिरिक्त काम करवून घेतले जाते तेव्हा जास्तीचा मोबदला द्यावा लागतो

## कंपनी हिशेबतपासणीसाचे स्थान -

कोणत्याही कंपनीच्या व्यवस्थापनामध्ये हिशेबतपासणीसाचे स्थान अत्यंत महत्वाचे व वैशिष्ठेपूर्ण आहे . कंपनी हिशेबतपासणीसाचे स्थान खालील मुद्द्यावरून स्पष्ट होईल .

**अ ) भागधारकांचा प्रतिनिधी**

**ब) कंपनीचा अधिकारी**

**कंपनीच्या हिशेबतपासणीसाला पदावरून दूर करणे किंवा हकालपट्टी किंवा काढून टाकणे** -:

२०१३ च्या कंपनी कायद्याच्या कलम १४० मध्ये हिशेबतपासणीसाला काढून टाकण्यासंबंधी तरतुदी आहेत. या कलमानुसार हिशेबतपासणीसाला त्याच्या नेमणुकीचा कार्यकाळ संपण्यापूर्वी पदावरून दूर करता येते ; परंतु त्यासाठी कंपनीच्या सर्वसाधारण सभेमध्ये ठराव संमत करावा लागतो व केंद्र सरकारच्या कंपनी law बोर्डाची पूर्वसंमती असावी लागते .

परंतु कंपनीच्या पहिल्या हिशेबतपासणीसाला त्याचा कार्यकाल संपण्यापूर्वी काढून टाकावयाचे असल्यास केंद्र सरकारच्या law बोर्डाची परवानगी घेण्याची आवश्यकता नसते .

एखाद्या हिशेबतपासणीसाला काढून टाकण्यासाठी कंपनी कायदा २०१३ च्या कलम १४० नुसार विशिष्ट पद्धतीचा अवलंब करण्यात येतो .

**कंपनी हिशेबतपासणीसाच्या  जबाबदाऱ्या**

**अ) दिवाणी स्वरूपाची जबाबदारी**

१) निष्काळजीपणा बद्दल

२) कर्तव्यभंगाबद्दल

**ब) फौजदारी स्वरूपाची जबाबदारी**

१) कंपनी कायद्यानुसार

२) भारतीय दंडविधानानुसार

**क) तृतीय पक्षासंबंधी  हिशेबतपासणीसाची जबाबदारी**

**ड) हिशेबतपासणीसाच्या  जबाबदारीच्या संदर्भात काही न्यायालयीन निर्णय**